# राज्यातील प्रदूषीत नद्यांच्या पट्टयांमध्ये प्रदूषण रोखण्याकरिता जिल्हा विशेष देखरेख पर्यावरण सनियंत्रण दलाच्या (Special Environment Surveillance Task Force), बैठकीचे इतिवृत्त

## जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
## दि.०५/०८/२०१९ दुपारी ४.३० वाजता संपन्न

जिल्हा विशेष देखरेख पर्यावरण सनियंत्रण दलाची (Special Environment Surveillance Task Force) प्रथम बैठक दि.०५/०८/२०१९ रोजी दुपारी ४.३० वाजता मा. निवासी जिल्हाधिकारी यांच्या दालनात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

---

राज्यातील प्रदूषीत नद्यांच्या पट्टयांमध्ये प्रदूषण रोखण्याकरिता जिल्हा विशेष देखरेख पर्यावरण सनियंत्रण दल (Special Environment Surveillance Task Force), पहिली बैठक दि. ०५/०८/२०१९ रोजी मा. निवासी जिल्हाधिकारी व जिल्हाप्रशासन अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये संपन्न झाली. सदर बैठकीस समितीमधील खालील समिती सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | नांव | हुद्दा | पद |
|---|---|---|---|
| १ | मा. श्री. अजित देशमुख | अध्यक्ष | निवासी जिल्हाधिकारी, जिल्हा सोलापूर |
| २ | मा. श्री. अतुल झेंडे | सदस्य | अतिरीक्त जिल्हा पोलीस अधिक्षक, सोलापूर. |
| ३ | मा. श्री. एस. आर. मोकाशी | सदस्य | विधी सेवा प्राधिकरण, अध्यक्ष सोलापूर |
| ४ | मा. श्री. पंकज जावळे | निमंत्रीत सदस्य | जिल्हा प्रशासन अधिकारी, सोलापूर |
| ५ | मा. श्री. प्रशांत भासले | समन्वयक | उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सोलापूर |

वरील उपस्थित सर्व सदस्य व संबंधीत अधिकारी वर्ग यांचे स्वागत श्री. प्रशांत भोसले, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर तथा सदस्य सचिव, जिल्हा विशेष देखरेख पर्यावरण सनियंत्रण दल यांनी करुन माननिय अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात केली.

बैठकीच्या सुरुवातीस सदस्य सचिव, जिल्हा विशेष देखरेख पर्यावरण सनियंत्रण दल तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी मा. राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांचे मुळ अर्ज क्र. ६७३/२०१८ प्रकरणे दि. २०/०९/२०१८ रोजीचे आदेशान्वये अवर सचिव पर्यावरण यांनी शासन निर्णय क्र. एनजीटी-२०१८/प्र.क्र.२/ता.क्र. ३ दि. १३/१२/२०१८ द्वारे राज्यातील प्रदूषित नदी पट्टयातील प्रदूषण कमी करण्याकरिता जिल्हा विशेष देखरेख पर्यावरण सनियंत्रण दलाची स्थापना करण्याबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार सोलापूर जिल्हयासाठी दि. ०१/०८/२०१९ रोजीच्या आदेश क्र. मप्रनिमं/उप्राकासो/१९०८०१-FTS-००५७ द्वारे समिती गठीत झाल्याचे सुचित केले.

उप प्रादेशिक अधिकारी म.प्रि.नि. मंडळ,सोलापूर यांनी सोलापूर जिल्हयात केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने सप्टेंबर २०१८ मध्ये प्रकाशित केलेल्या River Stretches for Restoration of Water Quality (State Wise and Priority Wise) या पुस्तकेनुसार एकुण ३ प्रदूषित पट्टे असलेबाबत असल्याबाबत समितीच्या निदर्शनास आणले.

सोलापूर जिल्हयातील नद्यांच्या प्रदूषित पट्टयांचे वर्गीकरण खालील प्रमाणे

| अ.क्र. | नदीचे नाव | प्रदूषित पट्टे | प्राधान्य क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | भिमा नदी | विठ्ठलवाडी ते टाकळी | प्राधान्य क्र. II |
| २ | सिना नदी | सोलापूर ते बंकलगी | प्राधान्य क्र. IV |
| ३ | चंद्रभागा नदी | पंढरपूर ते शेगांव धुमला | प्राधान्य क्र. IV |

अतिरीक्त पोलिस अधिक्षक तथा सदस्य जिल्हा विशेष देखरेख पर्यावरण सनियंत्रण दल यांनी सोलापूर जिल्हयातील नागरी स्वराज्य संस्थांना सदर समिती स्थापित झाल्याबाबत कळविण्याचे व मा. राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांचे मुळ अर्ज क्र. ६७३/२०१८ प्रकरणे दि. २०/०९/२०१८ रोजीचे आदेशान्वये अवर सचिव पर्यावरण यांनी शासन निर्णय क्र. एनजीटी-२०१८/प्र.क्र.२/ता.क्र.३ दि. १३/१२/२०१८ द्वारे राज्यातील प्रदूषित नदी पट्टयातील प्रदूषण कमी करण्याकरिता दिलेल्या आदेशांचे अनुपालन करण्याबाबत कळविण्याचे सुचविले.

उप प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक जिल्हा विशेष देखरेख पर्यावरण सनियंत्रण दल यांनी २ प्रदूषित नदी पट्टे भिमा नदीवरील असून त्यामध्ये मुख्यत: पंढरपूर नगरपरिषदेच्या हद्दीतुन जाणारे अप्रक्रियाकृत घरगुती सांडपाणी हा प्रदूषणाचा स्त्रोत होता परंतु पंढरपूर नगरपरिषद १५.५ एमएलडी चा सामाईक घरगुती सांडपाणी प्रकिया यंत्रणा बसवून कार्यान्वित केली असल्याचे सांगितले. तसेच अतिरिक्त २.५ एमएलडी इतक्या क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा नव्याने बसविली असल्याबाबत सांगितले.

अध्यक्ष, विधी सेवा प्राधिकार सोलापूर तथा सदस्य जिल्हा विशेष देखरेख पर्यावरण सनियंत्रण दल यांनी मा. हरित लवादाचे मुळ अर्ज क्र. ६७३/२०१८ प्रकरणे दि. २०/०९/२०१८ रोजीचे आदेश सर्व सदस्यांना उपलब्ध करून देण्याबाबत सुचविले.

उप प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक जिल्हा विशेष देखरेख पर्यावरण सनियंत्रण दल यांनी सोलापूर महानगरपालिकेने एकुण १०२ एमएलडी सामाईक घरगुती सांडपाणी यंत्रणा पुरविली असल्याचे निदर्शनास आणले व त्यामुळे सोलापूर शहराचे घरगुती सांडपाण्यावर पुर्णपणे प्रकिया करणे भविष्यात शक्य असल्याचे सुचविले. ज्यामुळे शेळगी नाल्याद्वारे सिना नदीकडे जाणारे पाणी पुर्ण प्रक्रिया केलेले असेल असे सुचविले.

वरीलप्रमाणे राज्यातील प्रदूषीत नद्यांच्या पट्टयांमध्ये प्रदूषण रोखण्याकरिता स्थापित जिल्हा विशेष देखरेख पर्यावरण सनियंत्रण दलाची (Special Environment Surveillance Task Force), पहिली बैठक मा.अध्यक्ष यांचे परवानगीने संपन्न झाल्याचे घोषित केले.

8/8/19

समन्वयक
जिल्हा विशेष देखरेख पर्यावरण सनियंत्रण दल
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ ,सोलापूर .

अध्यक्ष
जिल्हा विशेष देखरेख पर्यावरण सनियंत्रण दल
तथा
मा. निवासी जिल्हाधिकारी, सोलापूर